# " महानुभावांचे पंचकृष्ण"

**सौ. सुवर्णा रा. राऊत**
तायवाडे कॉलेज महादुला कोराडी

**प्रा. डॉ . राजेंद्र वाटाणे**
तायवाडे कॉलेज महादुला कोराडी

**प्राचार्या डॉ. शरयू तायवाडे**
तायवाडे कॉलेज महादुला कोराडी

Crossref DOI - https://doi.org/10.63665/rh.v7i2.141

---

**प्रस्तावना :**

प्राचीन मराठी वाङ्मय मुख्यता अध्यात्मिक स्वरूपाचे असून ते त्या त्या काळातील धर्मपंथीयांनी पंथ प्रसाराच्या हेतूने लिहिलेले आढळते . तेराव्या शतकातील दोन प्रमुख संप्रदाय म्हणून महानुभाव व वारकरी संप्रदाय यांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. एक द्वैतभक्तीतत्त्वाचा पुरस्करता संप्रदाय तर दुसरा अद्वैतत्त्वाचा अवलंब करणाऱ्या दोन्ही भिन्न उपसना पद्धतीचे उपास्य दैवत मात्र 'श्रीकृष्ण' च आहे.

दोन्ही संप्रदायाच्या प्रवर्तकांनी तसेच प्रचारकांनी हा प्रवाह गतिमान केलेला आहे. अभंगाच्या रूपाने, पदाच्या रूपाने, ढवळयांच्या रूपाने, विराण्याच्या रूपाने तो प्रवाह अखंड चालत राहिला आहे. तसे पाहता हे सर्वच 'भक्तिसाहित्य' आहे.

**विषय प्रवेश :**

महानुभव साहित्याचा प्रभाव पडण्याचे महत्त्वपूर्ण कारण ही आहे की, मराठी माणसाला आपले घरदार सोडून रानावनांत भटकायला सांगितले नाही. कर्मकांडांच्या जंजाळात गुरफटायला सांगितले नाही. उलट प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधायला सांगितले त्याचप्रमाणे या साहित्याने महाराष्ट्रातील जन माणसाला त्यांच्या मनाला भाबडे अंधश्रद्ध बनविले नाही. सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींची लौकिकांच्या कक्षा सांभाळून पारलौकिकाचा वेध घेण्याची महत्त्वकांक्षा विलक्षण होती. जगावेगळी होती, या प्रकारे सर्वसामान्यांना प्रभावित करण्याचे कार्य हे महानुभाव संप्रदायाने केलेले आहे. विशेषतः श्रीचक्रधरस्वामींचा कालखंड हा महाराष्ट्रातील ऐश्वर्याचा आणि समृद्धीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. देवगिरीच्या यादवांची कारकीर्द त्यावेळी चालू होती. धर्म श्रद्धेचे वातावरण हे सर्वत्र होते. यज्ञयाग आणि असंख्य सामान्य श्वद्र देवतांचे उपसना समाजात बोकाळत होती.

समाजाचा सर्व वेळ व्रतवैकल्य, कर्मकांड, जारण-मारण यामध्ये जात होता तसेच माणसाला अध्यपतनाकडे नेणारी मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध होती. चातुर्वर्ण्याची मिरासदारी समाजात वाढली होती. याचे सर्वांगीण दर्शन 'दृष्टांत पाठ', 'लीळाचरित्र' इत्यादी ग्रंथातून दिसून येते. सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींनी ज्ञान व भक्तीचा समन्वय करून आपल्या द्वैती तत्त्वज्ञानाचा प्रसार केला, चातुर्वर्ण्यवर हल्ला चढविला. महानुभाव संप्रदायात स्त्री ,शूद्र ब्राह्मण वैश्य , क्षत्रीय अशा सर्वांना संन्यास घेण्याची संधी उपलब्ध करून दिली.

श्रीचक्रधरस्वामी हे महानुभव संप्रदायाचे प्रवर्तक असल्याने या संप्रदायाच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांनी लोकभाषेचा स्वीकार केला. श्रीचक्रधरस्वामींनी केलेला लोकभाषेचा पुरस्कार हे या काळातील एक मोठे सांस्कृतिक कार्य होते.

**‘ महानुभावांचे पंचकृष्ण’** :

महानुभाव पंथात सगुण व साकार असा परमेश्वराची उपसना सर्वश्रेष्ठ मानली गेल्याने त्यांच्याशी सबंध अशा सर्व स्थावर जंगम वस्तू पवित्र व वंदनीय ठरतात.

महानुभव पंचकृष्ण मानतात ते सूत्र पाठाच्या सुरुवातीला सांगितलेले आहे .

जैसे द्वापरी श्रीकृष्ण चक्रवर्ती ll
जैसे सह्याद्री श्रीदत्तात्रेय प्रभू ll
जैसे द्वारावती श्री चांगदेव राऊळ ll
जैसे रिध्दीपुरी गुंडम राऊळ ll
जैसे प्रतिष्ठाने श्रीचांगदेव राऊळ ll

१) **श्रीदत्तात्रेयप्रभू** :

महानुभावांच्या ‘पंचकृष्णा’त पहिले नाव श्रीकृष्णचक्रवर्तींचे असले तरी अग्रक्रमाने पहिले श्रीदत्तात्रेयप्रभू होय. श्रीदत्तात्रेयप्रभूंचा अवतार त्रेतायुगात झालेला असला तरी तो कोणत्याही एका विशिष्ट युगाचा अवतार नसून चतुयुगाचा अवतार प्रमुख अवतार आहे असे महानुभाव मानतात.त्यांचे दर्शन ज्याने ज्ञानाधिकार व प्रेम अधिकार जोडला असेल त्यालाच होते. किंबहुना श्रीदत्तात्रेय प्रभूंनी उच्चालेला शब्द व त्यांनी दिलेला वर पूर्णतः खरा होतो.

श्रीचक्रपाणि व श्रीचांगदेव यांना त्यांनी एकदा माहूर येथे व्याघ्रवेषा दर्शन देऊन त्यांच्याकडून शक्ती स्वीकार करविला. पुढे या श्रीचक्रपाणी पासून किंवा श्रीचांगदेव-राउळापासून श्रीगोविंदप्रभूंनी व श्रीगोविंद प्रभूंपासून श्रीचक्रधर स्वामींनी शक्ती स्वीकार केला. म्हणजेच अशी अवतार परंपरा ठरवून श्रीदत्तात्रेयप्रभू त्या परंपरेतील मूळ स्थानी राहतात.

२) **श्रीकृष्णचक्रवर्ती** :

पंचकृष्णांपैकी दुसरा परमेश्वर अवतार म्हणजे व्दापर युगातील श्रीकृष्णचक्रवर्ती परमेश्वराचा पूर्ण अवतार असून गर्भिचा उभयदर्शी असा अवतार मानला जातो.

- त्यांनी केलेल्या लीळा श्रीचक्रधरस्वामींना आपली शिष्या महदाईसा हिला तिने प्रश्न केल्यावर सांगितले असून त्या ‘द्वापरीच्या लीळा’ किंवा ‘द्वापरचरित्रे’ म्हणूनही प्रसिद्ध आहे . श्रीचक्रधरस्वामींच्या शब्दात तो ‘चालता बोलता देव’ आहे या दृष्टीने श्रीकृष्णाच्या स्वभावातील मातृभक्ती, मित्रप्रेम समता, व्यवहारचातुर्य, विनोद बुद्धी, मार्मिकता इत्यादी गुण उल्लेखनीय आहेत. श्रीकृष्णाचे हे द्विविध दर्शन

महानुभाव वाङ्मयात सर्वत्र घडते.

३) **श्रीचांगदेव राऊळ** :

पंचकृष्णांपैकी तिसरे परमेश्वरा अवतार श्रीचांगदेव राऊळ किंवा श्रीचक्रपाणी हे होय. त्यांची ही दोन नावे निरनिराळ्या विशिष्ट कारणांनी पडली. श्रीचांगदेव सुरुवातीपासूनच मनाने विरक्त होते. त्यामुळे कमळाइसेशी लग्न करून सुद्धा ते तिच्यापासून दूरच राहिले शेवटी त्यांनी गृहस्थाश्रम सोडून अवधूताचा वेश धारण केल्यावर भिक्षाव्रत स्वीकारले. याप्रमाणे काही दिवस माहूर येथे राहून ते यात्रेकरूंच्या बरोबर द्वारावतीला आले. तेथे राहून जीवांचा उद्धार करण्याचे कार्य करीत होते. त्यांच्या दृष्टीने सर्व भेदाभेद नष्ट होऊन सर्वांप्रती समतुल्य राहिले. त्यांच्या दैवी सामर्थ्याची कीर्ती दूरवर पसरली होती. त्यांची ही सर्व गाथा ऐकून काऊरळीची कामाख्या या नावाची एक तरुण हटयोगिनी त्यांच्याकडे आकर्षित होऊन द्वारावतीला आली व त्यांना रती सुखाचे आव्हान देऊन त्यांच्या गुफेच्या दाराशी सात दिवस धरणे देऊन बसली शेवटी ती ऐकत नाही असे पाहून श्री चांगदेवांनी योगसामर्थ्याने ठाईच्या ठाई देह त्याग केला व आपला तो अवतार संपून त्याचवेळी भडोच येथे स्मशानात आणलेल्या प्रधान पुत्र हरीपाळदेव यांच्या मृतदेहात प्रवेश केला. आणि त्यांनी नवीन अवतार स्वीकारला

श्री चांगदेव राऊळ यांनी धारण केलेला हा नवीन अवतार म्हणजेच महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर होय. म्हणजे श्रीदत्तात्रेय पासून पर आणि अवर या उभयशक्तीचा स्वीकार करताना त्यांनी यापैकी परशक्ति आच्छादली व अवरशक्ती प्रकट केली. लीळाचरित्र ‘एकांक’ या भागातील पहिल्या चार लीळा श्रीचांगदेवराऊळा विषयी असून शिवाय ‘श्रीचक्रपाणी चरित्र’ म्हणून त्यांनी स्वतंत्र लीळेचे चरित्रही उपलब्ध आहे.

४) **श्रीगोविंदप्रभू** :

श्रीगोविंदप्रभू हे महानुभाव भावांच्या पंचकृष्णांपैकी चौथे परमेश्वरा अवतार होय. त्यांनी वऱ्हाडात (रिद्धीपूर - महानुभावांची काशी) क्रांतीकांटसरे या गावी एका कणव ब्राह्मणाच्या घरामध्ये अवतार स्वीकार केला. त्यांच्या आईचे नाव नेमाइसे व वडिलांचे नाव अनंत नायक होते. आई लहानपणी वारल्याने श्रीगोविंद प्रभुंचे पालन पोषण त्यांच्या मामाने व मावशीने केले. वयाच्या सातव्या वर्षी त्यांचे उपनय संस्कार होऊन शिक्षणासाठी ते रीधपुरास आले ते शेवटपर्यंत तेथेच होते. म्हणूनच पंचकृष्णाच्या नामावलीत त्यांचा उल्लेख हा ‘रिद्धीपुरेचे श्रीगुंडम राऊळ’ असाच होतो. कारण त्यांचे मूळ नाव गुंडम किंवा गुंडो असे ठेवले होते. श्रीगोविंदप्रभू हा परमेश्वरावतार म्हणजे ‘आच्छादनीचा परदृश्यावतार’ होता.

वस्तुतः पर आणि अवर अशा दोन्ही विद्या जाणणारा अर्थात उभय दृश्य असूनही ज्याचे आपल्या ठिकाणचे अविर विद्या अच्छादून केवळ परविद्या प्रकट केली आहे त्याला ‘आच्छादनीचा परदृश्यावतार’ म्हणून संबोधले जाते.

श्रीगोविंदप्रभूंनी श्रीचांगदेव राऊळांकडून शक्ती स्वीकार केला व रिद्धीपुरास परत येऊन ते जीवांचा उद्धार करण्याचे कार्य करीत आढळून आले. श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेदभाव त्यांच्यात कधीच नव्हता. स्वतः ब्राह्मण

असूनही महार मांगाच्या घरी अन्नोदक घेण्यात त्यांना काही वाटत नव्हते. कुणब्याच्या घरी जेवणे मांगाच्या पानपोयीतील पाणी पिणे, मुख्याला बोलके करणे , सावळापूरच्या लेकीचे माहेरपण करणे, लेकुरवाळ्या बायांच्या मुलांना पाळण्यात झोपवणे असे कार्य ते करीत. यामधून यादवकालीन जनमानसच आपल्याशी कथन पद्धतीने संवाद करताना दिसते ,म्हणूनच डॉ. वि.भि.कोलते म्हणतात, "प्राचीन मराठी गद्याचा नमुना म्हणून तर भाषा अभ्यासकांना (श्रीगोविंदप्रभूचरित्र) हा ग्रंथ नव्हाळीचा वाटेल. तत्कालीन वऱ्हाडी भाषेचे स्वरूप समजण्यासाठी या ग्रंथासारखे दुसरे महत्त्वाचे साधन नाही."

५) **सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामी** :

हे पंचकृष्णांपैकी पाचवे व शेवटचे अवतार होते महानुभाव पंथाचे प्रमुख प्रवर्तक म्हणून त्यांचा उल्लेख होतो त्यांचे श्री चक्रधर असे नामकरण हे श्री गोविंद प्रभूंनीच केले.

'लीळाचरित्र' हा महानुभावांचा मुख्य ग्रंथ असून त्यातील अनेक लीळा ह्या श्री चक्रधर स्वामी संबंधित आलेल्या आहेत श्री चक्रधर स्वामींच्या आयुष्यातील अनेक लीळा ह्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत एकांक पूर्वार्ध व उत्तरार्ध असे या ग्रंथाचे तीन भाग पडतात. 'एकांक' भागात त्यांनी अवतार धारण केल्यापासून तो त्यांच्या पैठण येथे आगमनापर्यंतचा वृत्तांत आला असून त्यात त्यांचे एकाकी जीवन क्रमाचे दर्शन घडते. पैठणला ते प्रथम एकांतातून लोकांतात आले व तेथून त्यांच्या आयुष्य क्रमाचे एक निराळे पर्व सुरू झाले. हे पूर्वर्ध व उत्तरार्ध अशा दोन भागात विभागलेले असून त्यापैकी पूर्वार्धाचा प्रारंभ त्यांनी पैठण येथे आल्यावर नागांबिकेला उर्फ बाईसेला. दिलेल्या प्रेमदानाने व त्यांचा शेवट खडकुली येथे नागदेव किंवा भटोबास यांना केलेल्या बोधनाने होतो. तेथून श्रीचक्रधरस्वामींच्या आयुष्याचा उत्तरार्ध सुरू होऊन तो त्यांच्या उत्तरापंथे प्रयाणकाला पर्यंत चालतो. भाषा, साहित्य, समाजदर्शन तत्त्वज्ञान अशा अनेक दृष्टींनी 'लीळाचरित्रा'चे जे महात्म्य आहे त्यांना अष्टपैलू हेच विशेषण शोभून दिसेल. 'लीळाचरित्र' हा स्मरणभक्तीचा एक अतिसुंदर असा अविष्कार असून त्याला मराठी वाङ्मयात तोड नाही. ह्यातील सौंदर्य वेदक भाषा, साक्षेपी, चौखंदळ व रसिक निवेदन लाभल्यामुळे हे चरित्र अधिकच सरस व रुचक झाले आहे.

**समारोप** :

महानुभाव पंथीय वाङ्मयाच्या संपूर्ण विवेचनातून हे लक्षात येते की, महानुभाव ग्रंथकारांनी मराठी भाषेतच गद्य पद्य ग्रंथाचे एक अभिनव परंपरा महाराष्ट्रात जोपासलेली असून श्री चक्रधर स्वामींच्या प्रमुख प्रेरणेने व पंथाच्या प्रसाराने बहुजन समाजाला व सामान्यांना प्रेरणा मिळून तत्कालीन समाजातील वास्तववादी जीवनाचा आध्यात्मिक वारसा पूर्णपणे जपण्याचा नवामार्ग उपलब्ध झाला तो म्हणजे केवळ 'महानुभावांच्या पंचकृष्णां'मुळे.

**आधार ग्रंथ :**

- लीळाचरित्र एकांक - डॉ. शं. गो. तुळपुळे

- प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास - ल. रा. नसीराबादकर
- महानुभावीय मराठी वाङ्मय- यशवंत खुशाल देशपांडे
- महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्मय -शं.गो. तुळपुळे.